आकाशवाणी पुणे

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – २७/०४/२०२४ वार – शनिवार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २९ आणि ३० एप्रिल रोजी नियोजित पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची सुरक्षा तसंच कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आज रात्री १२ वाजल्यापासून ते ३० एप्रिल रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पुणे शहर परिसरात पॅराग्लायडींग, हॉट बलुन सफारी, ड्रोन, मायक्रोलाईट एअरोप्लेन इत्यादी प्रकारच्या अवकाश उड्डाणावर निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत. या आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय दंड संहिता १८६० कलम १८८ च्या दंडनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असंही या आदेशात नमूद करण्यात आलं आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मावळ, पुणे आणि शिरुर मतदारसंघात नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांची विधानसभा मतदारसंघ क्षेत्रनिहाय दुसरी सरमिसळ, निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली. या प्रक्रीयेच्या माध्यमातून संबंधित विधानसभा क्षेत्रातील पथक निश्चित झाले असून विधानसभा क्षेत्रस्तरावरील दुसऱ्या सरमिसळ प्रक्रियेत मतदान केंद्रासाठी पथक निश्चित होईल.

पुणे जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक, निवडणूक पोलीस निरीक्षक आणि खर्च निरीक्षक यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत काल संध्याकाळी निवडणूक तयारीचा आढावा घेण्यात आला.

जेजुरी इथल्या श्री खंडोबा देवता आणि लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी यांच्या वतीनं आज श्री खंडोबा मंदिरात न्यासामार्फत सुरू करण्यात येणाऱ्या काही उपक्रमांचं उदघाटन आणि लोकार्पण करण्यात आलं. यामध्ये तेल घाणा उपक्रम तसंच निर्माल्यापासून सुवासिक

अगरबत्ती, धूप कोन उपक्रमाचं अनावरण झालं. मागील दोन वर्षात न्यासानं अनेक सोई सुविधा आणि सामाजिक उपक्रम राबवले आहेत.

पुणे महापालिकेच्या वतीनं माझी वसुंधरा अभियानांतर्गत काल भिडे पूल नदीकाठ परिसरात नदी स्वच्छता मोहिमेचं आयोजन करण्यात आलं. या अभियानात विविध क्षेत्रातील २५० व्यक्तींनी सहभाग नोंदवला आणि ३७० किलो सुका कचरा संकलित करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. या अभियानांतर्गत २२ एप्रिल ते २८ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे.

पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेची मान्सूनपूर्व आढावा बैठक आज पार पडली. पूर परिस्थितीत तातडीने घटनास्थळावर पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणावी, शहरातील नालेसफाईच्या कामांना गती द्यावी, लोकवस्तीत पाणी शिरण्याच्या घटनांवर लक्ष ठेवावे यासह अनेक आदेश आणि सूचना महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख २५ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. या वर्षी प्रथमच बिलावर युपिक आयडी छापण्यात आला आहे. महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचं वाटप सुरू करण्यात आलं आहे. नागरिकांनी मोबाईल क्रमांकाची खातरजमा करण्यासाठी ओटीपी देऊन या महिलाना सहकार्य करावं, असं आवाहन कर आकारणी आणि कर संकलन विभागानं केलं आहे.

राज्यातील साखर कारखान्यांनी चालू वर्ष २०२३-२४ आणि मागील हंगामातील उसाची रास्त आणि किफायतशीर किंमत म्हणजे एफआरपी रक्कम थकीत ठेवली आहे. त्यावर १५ टक्के व्याजासह ही रक्कम शेतकऱ्यांना मिळावी, अशी मागणी शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेने राज्य सरकारकडे केली आहे.

एकीकडे पशुखाद्याच्या किमतींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, तर दुसरीकडे मात्र दुधाच्या दरात वाढ होत नाही. शासनानं दुधाला वाढवून दर द्यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज पुण्यात केली.

निळू फुले यांच्या कुटुंबीयांच्या वतीनं प्रदान करण्यात येणारा निळू फुले कृतज्ञता सन्मान यावर्षी अभिनेते सुमीत राघवन यांना जाहीर झाला आहे. रविवार दिनांक ५ मे रोजी मयूर कॉलनी, कोथरूड येथील बालशिक्षण प्रशालेच्या एमईएस सभागृहात संध्याकाळी ०५.०० वाजता होणाऱ्या कार्यक्रमात सुमीत राघवन यांना हा सन्मान प्रदान करण्यात येईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे.

पुण्याचे माजी महापौर मोहनसिंग राजपाल यांचं आज पुण्यात दीर्घ आजाराने निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. रास्ता पेठ सोमवार पेठ भागातून ते तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले. २०१० मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे ते पुण्याचे महापौर झाले होते.

हवामान
पुणे आणि परिसरात उष्णतेचा पारा आज ४१ अंश सेल्सियसपर्यन्त पोहोचला तर किमान तापमान २३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.